## दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने लेखिकेचे मनोगत ....

पहिल्या आवृत्तीला वाचकांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला याचं महत्वाचं एकमेव कारण म्हणजे पुस्तकाच्या शिर्षकात पूज्य साने गुरुजींचं नांव असणे. साने गुरुजींच्या नावाचं गारुड ७२ वर्षानंतर सुद्धा आजही वाचकांच्या मनावर कायम आहे. पहिली आवृत्ती मामासाहेबांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त डिसेंबर २०१३ मध्ये ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांचे हस्ते, ज्येष्ठ विचारवंत आणि मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांचे उपस्थितीत प्रकाशित झाली. तेंव्हा प्रिंट बुक, ईबुक आणि ऑडीयो बुक अशा तिन्ही माध्यमात पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. प्रिंट बुक झिरीयस इमेजेस यांचे छापखान्यात तयार झाले. ईबुक साठी सहकार्य केले बुकगंगा पुणे यांनी, तर ऑडीयो बुक मी स्वतः राष्ट्रीय दृष्टिहीन संस्थेत वरळी येथे ध्वनिमुद्रित केले. त्यासाठी मधु मंगेश कर्णिक यांची प्रस्तावना त्यांच्याच आवाजात ध्वनिमुद्रित केली आहे. पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशनासाठी लोकमान्य सेवा संघाच्या श्री. वा. फाटक ग्रंथसंग्रहालयाचे मोलाचे सहकार्य लाभले, प्रसिद्धी माध्यमांनी सुद्धा पुस्तकाचे स्वागत केले, त्याबद्दल मी सदैव त्यांची ऋणी राहीन.

आज युवा पिढीचा इंग्रजी भाषेकडे असलेला ओढा लक्षात घेऊन या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद करण्याचे ठरवले, याची संपूर्ण जबाबदारी माझी मैत्रीण सुजाता नरसाळे हिने घेतली तसेच ज्येष्ठ लेखक अच्युत गोडबोले यांनी इंग्रजी प्रस्तावना लिहून उपकृत केले. हा इंग्रजी अनुवाद १२ जानेवारी २०१५ रोजी, युवादिनी ज्येष्ठ विचारवंत लेखिका डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचे हस्ते प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. तात्याराव लहाने यांचे उपस्थितीत प्रकाशित झाला. या इंग्रजी पुस्तकाला सुद्धा बर्यापैकी प्रतिसाद मिळाला. तसेच पश्चिम बंगाल शासनाकडून राजाराम मोहन राय ग्रंथ खरेदी योजने अंतर्गत या इंग्रजी पुस्तकाच्या १४० प्रतींची मागणी केली गेली. मी काही प्रतिथयश लेखिका नाही, तरी माझ्या लिखाणाला वाचकांनी मला

*अपेक्षित होता त्यापेक्षा कितीतरी पटींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पुस्तकाच्या किती प्रती खपल्या यावर माझ्या मते पुस्तकाचे यश अवलंबून असू नये, तर वाचकांच्या सकारात्मक प्रतिसादावर ते असावे.*

*दामू.... पुस्तकाची दुसरी आवृत्ती हुंडाविरोधी चळवळीतर्फे प्रकाशित करण्याचे ठरले तेंव्हा मनात आलं की चळवळीला वैचारिक पाठींबा देणाऱ्या काही मान्यवरांना, ज्यांना हे पुस्तक मनापासून भावले, मनोगत लिहिण्याबद्दल विनंती करावी. आणि तसे मी केलेही, माझ्या विनंतीला मामासाहेबांच्या आदरापोटी ज्या मान्यवर दिग्गजांनी सकारात्मक प्रतिसाद दिला त्यांची मी जीवनभर ऋणी राहीन. सानेगुरुजींचे चहाते ज्ञानपीठ पुरस्कार विजेते गोव्याचे श्री दामोदर मावजो उपाख्य भाई, ज्येष्ठ साहित्यिका श्रीमती माधवी कुंटे, लोकप्रिय लेखक श्री अच्युत गोडबोले, शिक्षणतज्ज्ञ, लेखक व यशस्वी मुलाखतकार श्री हेरंब कुलकर्णी, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष श्री शमशुद्दीन तांबोळी, पुणे आकाशवाणी केन्द्राचे निवृत्त संचालक श्री गोपाळ अवटी, यांनी लिहिलेल्या मनोगतांमुळे या दुसऱ्या आवृत्तीचा साहित्यिक दर्जा नक्कीच उंचावला आहे.*

*दुसरी आवृत्ती शुद्ध लेखन आणि व्याकरण या बाबत परिपूर्ण करण्यासाठी पहिल्या आवृत्ती प्रमाणेच दुसऱ्या आवृत्तीसाठी सुद्धा गणितज्ज्ञ आणि भाषातज्ज्ञ विदुषी मेधा लिमये यांनी परिश्रम घेतले, मुद्रित शोधानाचे काम चोख केले. अंतर्गत मांडणी आणि डी.टी.पी. साठी पूर्णिमा नार्वेकर आणि चंद्रसेन साळवी या दोघांनी परिश्रम घेतले. नितीन सोमण यांच्या इम्प्रेशन ग्राफिक या छापखान्यात दुसरी आवृत्ती छापली जाणार आहे. या सर्वांचे ऋण मी कधीच विसरू शकणार नाही.*

*वाचकांनी असाच लोभ ठेवावा आणि प्रतिसाद द्यावा अशी अपेक्षा करते.*

*- आशा दामोदर कुलकर्णी.*